# कमलपुष्प

एके दिवशी एक कमलपुष्प उमलले.
पण माझे चित्त होते भरकटलेले.
आणि ते मला कळलेच नाही. खरंतर माझी
परडी रिक्त होती आणि ते कमलपुष्पही दुर्लक्षित राहिले.

पुनःपुन्हा माझ्यावर औदास्याची छाया पसरत राहिली.
अखेर मी जागा झालो माझ्या स्वप्नावस्थेतून.
दक्षिणवाऱ्याच्या झुळुकांवर दरवळणाऱ्या
एका अद्‌भुत मधुर गंधाची जाणीव होऊ लागली.

त्या अनोख्या गंधमाधुर्याने माझा अंतराय
व्याकुळ झाला आणि वाटले की
परिपूर्ततेची आस लागलेला वसंताचा श्वासच
बहुधा माझ्याकडे तरंगत आलाय.

पण तो सुगंध माझ्या इतका निकट होता!
मला हे उमगलंच नाही, की तो माझाच होता.
तो पूर्णत्वाचा सुगंध माझ्याच
हृदयात खोलवर उमलला होता!

Original poem by Rabindranath Tagore in Gitanjali
Translated by Abhay B. Joshi and Milind A. Toro